# महाराष्ट्र

मंगळवार, दि. २५ सप्टेंबर २०१२ नऊ | सामना




## 'बर्फी'ची झेप शंभर कोटींवर

**मुंबई :** ऑस्कर पुरस्कारासाठी नुकताच नामांकित झालेला 'बर्फी' चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच हिट असून या चित्रपटाने गेल्या दहा दिवसांत तब्बल शंभर कोटींवर झेप घेतली आहे. एक था टायगर, बोल बच्चन आणि राउडी राठोडनंतर १०० कोटींच्या घरात पोहोचणारा हा एकमेव चित्रपट आहे. त्यामुळे येणाऱ्या दिवसात हा चित्रपट कितीचा पल्ला गाठतोय याच्या प्रतीक्षेत सर्वजण आहेत. अनुराग बासू दिग्दर्शित केवळ ३० कोटींचे बजेट असणारा 'बर्फी' सध्या बॉक्स ऑफिसवर चांगलाच गाजतोय. रणबीर कपूर, प्रियांका चोप्रा आणि इलियेना डिक्रोझा यांची प्रमुख भूमिका या चित्रपटात आहे. मुकबधिर मुलगा रणबिर कपूर आणि ऑटिस्टिक मुलगी प्रियांका चोप्रा यांची हलकी फुलकी प्रेमकहाणी अगदी सहज आणि सोप्या भाषेत मांडली आहे. त्यामुळे या चित्रपटाने अगदी चित्रपट चाहत्यांपासून सर्वांनाच भुरळ घातली आहे. या चित्रपटाने गेल्या दहा दिवसांत १०० कोटींचा आकडा पार केला आहे, असे चित्रपट व्यवसाय तज्ज्ञ तरण आदर्श यांनी ट्विटरवर सांगितले आहे.



जुहू येथील ल्युडो टॉकीज येथे सुरू केलेल्या महाराष्ट्र वाहतूक (महासंघ) सेनेच्या स्टॅण्डचे उद्घाटन अध्यक्ष उदय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यावेळी सरचिटणीस सूर्यकांत तांडेल, कार्याध्यक्ष अशोक टाव्हरे, उपाध्यक्ष - नारायण पवार, उपाध्यक्ष - प्रमोद सावंत, चिटणीस - भरत पिसाळ, चिटणीस - विक्रम जयस्वाल, उपविभागप्रमुख सुनील दळवी, सुनील भागडे, शाखाप्रमुख शरद प्रभू, नगरसेविका भावना मांगेला, स्टॅण्डप्रमुख गंगाधर तुळशीकर, उपस्टॅण्डप्रमुख प्रताप वैद्य, स्टॅण्ड खजिनदार आलम शेख, मोहम्मद शेख, प्रकाश वैद्य आदी.



कामगार सेनेच्या वरळी आगाराच्या सचिवपदी भालचंद्र कदम यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना ग्राहक संरक्षण कक्षाचे सरचिटणीस अरुण जगताप आणि निखिल सावंत.

# ॲपलॅबमधील १६० कामगारांची उपासमार

इलेक्ट्रॉनिक कंपनी म्हणून प्रख्यात असलेल्या ठाण्यातील ॲपलॅब कंपनीमधील १६० कामगारांची गेल्या गुढीपाडव्यापासून उपासमार होत आहे. हे सर्व कामगार राजन राजे यांच्या ॲपलॅब कामगार संघटनेशी संबंधित आहेत.

ॲपलॅब कंपनीत राजन राजे यांच्या युनियनबरोबरच इंजिनीयर वर्क्स असोसिएशन हीही एक युनियन आहे. इंजिनीयर वर्क्स असोसिएशनचे १४८ कामगार या कंपनीत सध्या कार्यरत आहेत. या दोन्ही युनियनचे जवळपास २० कामगार आणि पदाधिकाऱ्यांना कंपनीमधून व्यवस्थापनाने वेगवेगळ्या कारणावरून कंपनीच्या व्यवस्थापनाने निलंबित केलेले आहे. सध्या या कंपनीतील हा वाद ठाणे औद्योगिक न्यायालयात सुरू आहे. कंपनीच्या आवारात आंदोलन करण्यास सध्या न्यायालयाने ॲपलॅब कामगार संघटनेस प्रतिबंध केला आहे. यामुळे कंपनीमधील कामगारांचा लढा हा आम्ही न्यायालयाच्या माध्यमातून लढत आहोत, असे मनोज सूर्यवंशी यांनी सांगितले.

निलंबित कामगार युनियन पदाधिकाऱ्यांना पुन्हा कंपनीच्या सेवेत घ्या, दोन वर्षांचा बोनस द्या, पगारवाढ द्या, महिला कामगारांची संख्या जास्त असल्याने कंपनीत पाळणाघर सुरू करा आदी प्रमुख मागण्या ॲपलॅब कामगार संघटनेच्या असल्याचे चिटणीस मनोज सूर्यवंशी यांनी सांगितले. ॲपलॅब कंपनीमधील कामगारांचे निवृत्तीचे वय ६० होते, पण निवृत्तीचे हे वय खोटे दस्तऐवज करून कंपनीने ५८ केले असा आरोप ॲपलॅब कामगार संघटनेतर्फे करण्यात आला आहे.

१६० कामगारांची आज उपासमार होत आहे. याची कंपनीच्या व्यवस्थापनास काहीच काळजी दिसत नाही. यामुळेच कंपनी आमच्या युनियनशी चर्चाही करीत नाही, असे ॲपलॅब कामगार संघटनेचे म्हणणे आहे.

१६० कामगारांच्या रोजीरोटीचा हा प्रश्न असल्यामुळे कंपनी व्यवस्थापन आणि युनियनने सामंजस्याची भूमिका घेऊन हा प्रश्न सोडवावा, अशी मागणी कामगारवर्गातून होत आहे. व्यवस्थापनानेसुद्धा जास्त ताणून धरू नये, युनियन चर्चेस तयार असेल तर कंपनीने चर्चा करून १६० कामगारांना त्वरित न्याय देण्याची भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे या प्रश्नाकडे कामगार आयुक्तांनीसुद्धा एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहून १६० कामगारांची उपासमार थांबवावी असाही सूर कामगारवर्गातून उमटत आहे.

## रिझर्व्ह बँक स्टाफ कॉलनी, माहीम कल्याण समिती स्थापन

*शिवसेना* उपनेते, भारतीय कामगार सेना अध्यक्ष, रिझर्व्ह बँक वर्कर्स युनियनचे अध्यक्ष सूर्यकांत महाडिक, रिझर्व्ह बँक स्टाफ कॉलनी, माहीम कल्याण समितीचे अध्यक्ष प्रदीप पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली २०१२ ते २०१५ या वर्षांकरिता रिझर्व्ह बँक स्टाफ कॉलनी, माहीम येथील कल्याण समिती, पूजा समिती व महिला कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी युनियनचे कार्यकर्ते रमेश पितळे, कल्याण समितीचे अध्यक्ष प्रदीप पंडित, कार्याध्यक्ष रविंद्र दळवी, सरचिटणीस अंकुश घाणेकर, रमेश पितळे, स्मिता लाड, राजेश जाधव, उदय पराडकर, प्रकाश बेंगेरा, भारती शिंदे, सुवर्णा पेडणेकर, लक्ष्मी सिंगल उपस्थित होते.



रिझर्व्ह बँक स्टॉफ कॉलनी, माहीम कल्याण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कामगार सेनेचे अध्यक्ष सूर्यकांत महाडिक यांची भेट घेतली. यावेळी स्टॉफ कॉलनी पूजा समितीचे उपस्थित पदाधिकारी.

### कामगार वृत्त

## अण्णासाहेब पाटील जयंतीनिमित्त आज माथाडी कामगारांचा मेळावा

*माथाडी* कामगारांचे भाग्यविधाते कै. अण्णासाहेब पाटील यांच्या ७९ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी २५ सप्टेंबर रोजी नवी मुंबईतील तुर्भे येथील एपीएमसी मार्केट लिलावगृह (कांदा, बटाटा मार्केट) येथे सकाळी १० वाजता माथाडी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यास उपमुख्यमंत्री अजित पवार, उत्पादक शुल्क व ठाणे जिल्हा पालकमंत्री गणेश नाईक, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड, जलसंपदा व सातार जिल्हा पालकमंत्री रामराजे नाईक-निंबाळकर, कामगार मंत्री हसन मुश्रीफ, सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, अध्यक्ष एकनाथ जाधव, सरचिटणीस आमदार नरेंद्र पाटील, कार्याध्यक्ष गुलाबराव जगताप, कार्याध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे आदी अन्य मान्यवर व तमाम माथाडी कामगार उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात



पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी अंधेरीतील आझादनगर सार्वजनिक उत्सव (अंधेरीचा राजा) समितीने ५० हजार कापडी पिशव्या तयार केल्या. या पिशव्यांचे उद्घाटन महापौर सुनील प्रभू यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पालिका सभागृहनेते यशोधर (शैलेश) फणसे, समितीचे अध्यक्ष महेंद्र धेडिया, सुबोध चिटणीस, सचिन नायक, विजय सावंत, एम. के. मेनन, राजू फणसे, उदय सालियन, महादेव शिलोट आदी उपस्थित होते.

### मानसिक आरोग्यदिनानिमित्त व्याख्यान

*साने* गुरुजी बालविकास मंदिर आणि परमहित संस्था यांच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्यदिनानिमित्त डॉ. अंजली जोशी यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. बुधवार दि. १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या प्रा. गावस्कर सभागृहात व्याख्यान होणार असून बालविकास मासिकाचे संपादक यशवंत क्षीरसागर अध्यक्षपद भूषविणार आहेत. मन:स्वास्थ्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व व उपयुक्तता ध्यानात घेऊन पालक, अध्यापक व विद्यार्थ्यांनी व्याख्यानास उपस्थित राहावे,असे आवाहन प्रमुख कार्यवाह संतोष केसरकर यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

*'आपला परिवार'* चॅरिटेबल ट्रस्ट व 'आम्ही चमकते तारे'च्या टीमने नुकतेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप केले. संस्थेचे अध्यक्ष रमेश सावंत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते दीपक चव्हाण, शाम कुवळेकर, काशिनाथ पवार यांच्या हस्ते पाचशेहून अधिक विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास 'आम्ही चमकते तारे' या चित्रपटाचे निर्माते दीपक चौधरी यांचे सहाय्य लाभले. याप्रसंगी सुनील कदम, संस्थेचे विश्वस्त भास्कर कोर्लेकर, जी.जी. अंब्रे, संजय कदम, अभिजित कोर्लेकर, विजय शिंदे, संजय तळेकर, निशिगंधा कुवळेकर, दीपा परब आदी उपस्थित होते.



माझगाव येथील शिवसेना शाखा क्र. २०२ च्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना उपनेते यशवंत जाधव, उपविभागप्रमुख रामसावंत, डॉ. महेंद्र लोखंडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. जितेंद्र जाधव, युवा विभाग अधिकारी सिद्धेश मंडलिक, कमलेश आंब्रे, रितेश दुर्गवळी, ज्ञानप्रकाश तिवारी, महिला शाखा संघटक अनुराधा परब व शाखाप्रमुख विद्याधर चव्हाण उपस्थित होते.

## रमा शहा यांचा 'विघ्नहर्ता' विश्वविक्रम

१२ वर्षात २,१२,००० गणेशमूर्ती तयार केल्या



डोळ्यावर पट्टी बांधून गणेशमूर्ती करण्याचे रेकॉर्ड

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - आपल्या डोळ्यापुढे ध्येय असेल तर कोणतेही काम अशक्य नाही. रमा सतीश शहा - केसरवाला या महिलेने गेली २२ वर्षे विघ्नहर्त्याच्या मूर्ती घडविण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवले असून नुकतान त्यांनी १२ वर्षात २,१२,००० गणेशमूर्ती तयार करण्याचा विक्रम केला आहे.

रमा यांचे सतीश शहा यांच्याशी वयाच्या १९ व्या वर्षी लग्न झाले. मार्च २००० मध्ये त्यांना आकाशात गणेशमूर्तीचे दर्शन घडले. त्यानंतर त्यांनी गणेशमूर्ती घडविण्याचा ध्यास घेतला. मूर्ती घडविताना नवाकार मंत्राचे स्मरण त्या करीत असतात. याखेरीज संकटनाशन स्तोत्र, ओम गं गणपतये नम: या मंत्राचा त्या सतत उच्चार करीत असतात. त्यांनी तयार केलेल्या मूर्तींना गणेशभक्तांकडून मोठी मागणी आहे.

विशेष म्हणजे रमा शहा डोळ्यावर पट्टी बांधून गणेशमूर्ती तयार करतात. मूर्ती बनविण्याचे जाहीर प्रयोग त्या करतात. त्यांच्या गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. त्यांनी घडविलेल्या गणेशमूर्ती अनेक सेलिब्रिटींच्या घरी आहेत. रमा यांनी रिध्दि, वृध्दि आणि हर्ष या तीन मुलांना सांभाळत गणेशमूर्ती घडविण्याचा विक्रम केला आहे. त्यांनी अनब्रेकेबल व वॉशिबल गणेशमूर्ती कोणताही साचा न वापरता तयार केल्या आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क - ०२२-२४०७३३४८/ ९८९३३०५३३४८.

## बँक ऑफ बडोदा करणार २० हजार कर्मचाऱ्यांची भरती

चेन्नई, दि. २४ (वृत्तसंस्था) - येत्या ४ वर्षात सुमारे २० हजार कर्मचारी भरती करून घेण्याचे बँक ऑफ बडोदा नियोजन करीत आहे. चालू आर्थिक वर्षात (२०१२-१३) देशात व परदेशात तब्बल ५०० शाखा व कार्यालये उघडण्याचे बँकेने ठरविले आहे. बँक ऑफ बडोदाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एम. डी. मल्ल्या यांनी येथे ही माहिती दिली.

बँक ऑफ बडोदाच्या सध्या देशात ४००० शाखा असून परदेशात ९६ शाखा व कार्यालये आहेत. येथील विभागीय कार्यालयात 'बडोदा प्राईड'चे उद्घाटन मल्ल्या यांच्या हस्ते आज झाले. येत्या ४ वर्षात आम्ही २० हजार कर्मचारी भरती करणार आहोत. देशात ५०० शाखा मार्च २०१३ पर्यंत आम्ही उघडणार असून युगांडा, केनिया आणि दुबई येथे कार्यालये सुरू केली जातील. सद्या बँक ऑफ बडोद्याचा २५ देशात व्यवहार सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### घरासाठी सवलतीच्या दराने कर्ज

बँक ऑफ बडोदाची आर्थिक उलाढाल ६.७२ लाख कोटी रुपयांवर गेली असून त्यामध्ये २८ टक्के परदेशी व्यवहारांचा समावेश आहे. बँक ग्राहकांसाठी वाहने आणि घरासाठी येत्या सणासुदीच्या काळात सवलतीच्या दराने कर्ज देईल, अशी माहिती त्यांनी दिली.

> मार्च २०१३ पर्यंत आणखी ५०० एटीएम सेंटर बँक सुरू करणार असून एटीएम सेंटरमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासह सुरक्षा व्यवस्था वाढविण्याकडे आमची बँक लक्ष देत आहे.
> **- एम. डी. मल्ल्या,** अध्यक्ष बँक ऑफ बडोदा

## ॲट्रॉसिटी ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी रॅली

*मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - खैरलांजी हत्याकांडाला सहा वर्षे होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दलितांवरील अत्याचार रोखण्यासाठी ॲट्रॉसिटी ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून जातीय अत्याचार प्रतिबंध अभियानच्या वतीने राज्यव्यापी रॅली सुरू करण्यात आली आहे. ११ सप्टेंबरपासून ही रॅली सुरू असून २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता रॅलीचे आझाद मैदानात आगमन होणार आहे.*

*ॲड. प्रियदर्शनी तेलंग आणि केवल उके यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली राज्यभर सुरू आहे. या रॅलीत सहभागी कार्यकर्त्यांचे राज्यमंत्री नितीन राऊत, मुंबईचे महापौर सुनील प्रभू स्वागत करणार आहेत, तर आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले, कायदेतज्ज्ञ सुरेश माने, आमदार चंद्रकांत हंडोरे, आदी मान्यवर अत्याचार प्रतिबंध कायदा आणि सुधारणा यावर जाहीर सभेमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.*

## पंचायत समिती सभापतींना मिळणार जादा अधिकार

मुंबई, दि. २४ खास प्रतिनिधी - राज्यातील ३५० तालुक्यातील पंचायत समिती सभापतींना जादा अधिकार देण्याचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाने तयार केला आहे. कोणते अधिकार असावेत, याचा अहवाल तयार करण्यासाठी ग्राम विकासमंत्री जयंत पाटील यांनी नाशिक महसूल विभागातील सभापती आणि जिल्हा परिषद अध्यक्षांची समिती नेमली आहे. येत्या पंधरा दिवसांत अहवाल प्राप्त होईल, असे पाटील यांनी सांगितले.

### ग्राम विकास विभागाचा प्रस्ताव

पंचायत समितीस्तरावरील कामचुकार कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचेही अधिकार सभापतींना नाहीत. त्यासाठी जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवावा लागतो. तसेच या सभापतींना आर्थिक विषयांवर निर्णयाचेही अधिकार नसल्याने नाशिक दौऱ्यात जयंत पाटील यांच्याकडे तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे पाटील यांनी तत्क्षणी समिती नेमली.

### मानधन वाढीचा निर्णय दोन दिवसांत


जिल्हा परिषद अध्यक्षांसह पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषदेतील स्थायी, बांधकाम, शिक्षण, कृषी आणि महिला व बालकल्याण समिती सभापतींना १९९४ पासून महिन्याला केवळ पाच हजार रुपयांचे मानधन दिले जाते. यात येत्या दोन दिवसात भरीव वाढ करणार असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमधील रिक्त जागा भरण्याची मोहिम सुरु करण्यात येणार आहे. पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली जाईल आणि रिक्त होणारी पदे भरली जातील, असेही त्यांनी सांगितले.

## मुंबई-गोवा महामार्गाची पुन्हा चाळण

लांजा, दि. २४ (सा.वा.) - गणेशोत्सवापूर्वी आठ दिवस अगोदर शिवसेनेच्या दणक्यामुळे खारेपाटण महामार्ग उपविभागाने लांजा तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील मठ ते वाकेडदरम्यानचे पडलेले खड्डे भरण्याची मोहीम हाती घेतली होती. मात्र खड्डे भरून चार ते पाच दिवस होत नाहीत तोपर्यंत महामार्गाची अवस्था: चाळण झाल्याने पुन्हा परतीच्या गणेशभक्त व वाहनचालकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.


लांजा तालुक्यातून जाणाऱ्या महामार्गावर मठ ते वाकेड यादरम्यानच्या अंतरावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. लांजा शहरातील महामार्गाची झालेली दुरवस्था तर गंभीर आहे. तालुक्यातील आंजणारी घाटी, वेरळ घाटी, शेती शाळा, लांजा शहर, कोर्ले फाटा, काळा पूल, कुक्कुटपालन, कुवे ते वाकेड घाटात मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. यादरम्यान २५ ते ३० किमीच्या अंतरापर्यंत खड्डे चुकविताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

### बुजवलेले खड्डे उघडे पडले



मुंबई-गोवा महामार्गावर आठवडाभरापूर्वी बुजविण्यात आलेले खड्डे वाहनांच्या वर्दळीनंतर लगेच उघडे पडलेत.

## मदतीचे आवाहन



मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - अमित वाघमारे हा पंधरा वर्षीय मुलगा ब्लड कॅन्सरच्या विकाराने ग्रस्त असून त्याच्यावर परेल येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

अमितच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून त्याच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न केवळ पंधरा हजार रुपये आहे. त्याच्या उपचारासाठी दोन लाख रुपये एवढा खर्च येणार असून परिस्थितीमुळे मात्र त्यांच्या कुटुंबीयांना एवढा खर्च करता येणे शक्य नसल्यामुळे त्यांना आपल्याकडून मदतीची अपेक्षा आहे.

दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी अमितला मदत करण्यासाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या नावाने धनादेश काढून ते धनादेश राजेश पाटील, अबुकसाई चाळ नं.२, रूम नं.१४, सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई -२८ येथे पाठवावेत असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी पुढील मोबाईल क्रमांकावर संपर्क ९८९२२४८७८४,९९३००८९६४९.

## हिंदुस्थानी कोंबड्यांवरील बंदी ओमानने घेतली मागे

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - हिंदुस्थानी कोंबड्यांवर घातलेली बंदी ओमानने उठविली आहे. येत्या १० दिवसांनंतर हिंदुस्थानातील कोंबड्या ओमानमध्ये उपलब्ध होतील अशी माहिती 'मस्कत डेली' या वृत्तपत्राने प्रसिद्ध केली आहे.

जागतिक प्राणी आरोग्य संघटनेने ओडिशा, त्रिपुरा आणि मेघालयात एव्हियन इन्फ्ल्युएंझा हा रोग पोल्ट्रीमध्ये पसरल्याचे घोषित केल्यावर ओमानने हिंदुस्थानातील कोंबड्यांवर बंदी घातली होती. हिंदुस्थानातील जिवंत कोंबड्या आणि पोल्ट्री उत्पादनांवरील बंदी १८ सप्टेंबर रोजी अधिकृतरीत्या उठविली असल्याची माहिती ओमानचे कृषी व मत्स्य उत्पादन मंत्री फुअद बिन जाफर मोहम्मद अल साजवानी यांनी दिली. हा निर्णय घेतल्याचे एका अधिकृत पत्रात त्यांनी म्हटले आहे. पशुवैद्यकीय प्रशासनाच्या सल्ल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

> ओमानने बंदी घालण्यापूर्वी १५० ते २०० टन फ्रोजन चिकन हिंदुस्थानातून आयात केले होते. सध्या हिंदुस्थानात सणांचा हंगाम सुरू आहे. दहा दिवसांनंतर हिंदुस्थानी चिकन व पोल्ट्री उत्पादने ओमानच्या बाजारपेठेत दाखल होतील.
> **- प्रशांत देसाई, व्यवस्थापक,** अल हमादी ट्रेडिंग अँड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी